# NANAI DAIRY PRIVATE LIMITED - IN LIQUIDATION

**LLPIN: U15209MH2009PTC189530**

**Regd. Add: G - 1, Avishkar Empress, K. W. Chitale Path, Behind Portuguese Church, Dadar (W), Mumbai – 400028, Maharashtra, India.**

## E-Auction Notice

Sale of Assets of Nanai Dairy Private Limited ('Corporate Debtor') under the Insolvency and Bankruptcy Code, 2016 r/w IBBI (Liquidation Process) Regulations, 2016.

**Date and Time of E-Auction: 18th April, 2024 at 11:00 AM to 02:00 PM**
**(With the unlimited extension of 10 minutes each)**

Sale of Asset of Corporate Debtor by the Liquidator appointed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench vide order dated 13th October 2023 in **I.A. 3310 OF 2023 IN C.P.(IB) No. 4455 of 2019.** The sale will be done by the undersigned through the E-auction platform **https://eauctions.co.in (Linkstar Infosys Private Limited)**

| Details of Assets | Block | Reserve Price | Earnest Money Deposit | Incremental Value |
|---|---|---|---|---|
| Plant & Machinery collectively consisting of Milk Processing Plant, Vacum Milking Plant with accessories, S.S. Automatic Volumetric filling machine, cream Separator tanks etc. currently at Pali Budruk, Tal.Panvel, Dist.Raigad, Maharashtra – 410 206 (Complete list as available with Liquidator mentioned in detailed Auction Process Document) | I | ₹ 28,00,000/- | ₹ 2,80,000/- | ₹ 1,00,000/- |

| | |
|---|---|
| Last date of submission of Eligibility Documents | **4th April, 2024 in the manner mentioned in detail E-auction Process Document** |
| Declaration of Eligibility Bidder | **6th April, 2024** |
| Inspection of Assets of Corporate Debtor | **From 7th April, 2024 to 13th April, 2024.** |
| Last Date for submission of Earnest Money Deposit | **16th April, 2024** |
| Date and time of E-Auction for qualified bidders | **18th April, 2024 at 11:00 AM to 02:00 PM** |

**Terms & Conditions of the sale is as under:**

**1.** E-Auction will be conducted on "AS IS WHERE IS" as such sale is without any kind of warranties and indemnities through approved service provider Linkstar Infosys Private Limited Contact person on behalf of E-Auction Agency (Linkstar): **Contact person: Mr. Dixit Prajapati Email id-admin@eauctions.co.in, Mobile No.: +91 9870099713. 2.** Eligibility Documents shall be submitted to Liquidator through email and hard copy in the format prescribed in the detailed E-auction Process Document on or before 4th April, 2024. The bid form along with detailed terms & conditions of the complete E-auction process can be downloaded from the website **https://eauctions.co.in. 3.** It is clarified that this invitation purports to invite prospective bidders and does not create any kind of binding obligation on the part of the Liquidator or the Company to effectuate the sale. The Liquidator reserves the right to cancel or modify the process and/or not to accept and/or disqualify any interested party / potential investor/bidder without assigning any reason and without any liability. **4.** All the terms and conditions are to be mandatorily referred from the detailed E-Auction Process Document, prior to submission of EMD and participation in the process. The Liquidator can be contacted at **liqnanai@gmail.com**

**Date: 21.03.2024**
**Place: Navi Mumbai**

**CA Prashant Jain**
**Liquidator – Nanai Dairy Private Limited**
**IBBI Reg. No: IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131**
**Email ID: ipprashantjain@gmail.com; liqnanai@gmail.com**
**Correspondence Address: SSARVI Resolution Services LLP, B-610, BSEL Tech Park, Sec. 30 A, Vashi, Navi Mumbai- 400 705**
**Contact No: +91 9082607703 (Call on WhatsApp)**

Prashant Jain

Digitally signed by Prashant Jain
Date: 2024.03.22 17:10:34 +05'30'

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# जंगलांच्या विनाशाकडे अक्षम्य दुर्लक्ष

संपूर्ण जगभर पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण होतो आहे. जागतिक हवामान संघटनेने नुकत्याच प्रकाशित केलेल्या अहवालात २०२३ हे वर्ष आतापर्यंतचे सर्वाधिक तापमान असलेले वर्ष होते अशा प्रकारचा उल्लेख केला आहे. याचा अर्थ भविष्यकाळामध्ये तापमानाचे हे संकट वाढण्याचीच शक्यता स्पष्टपणे दिसून येते. २०२४ हे वर्ष म्हणजे सगळ्या जगासाठी रेड अलर्ट असल्याचा स्पष्ट उल्लेखही या विश्व हवामान अहवालामध्ये दिला गेला आहे. या वाढत्या तापमानाचे अनेक प्रकारचे परिणाम भविष्यकाळात पुढे येऊ शकतात. प्रदूषणाबरोबरच अल निनोसारख्या घटनादेखील चिंताजनक ठरू शकतात. तापमानाचे हे वाढते प्रमाण रोखण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न होत असूनही त्याला अपेक्षेप्रमाणे यश येताना दिसत नाही. जगभरातल्या देशांनी केलेल्या पॅरिस करारानुसार हवेतील कार्बनचे प्रमाण कमी करणे, अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांना प्रोत्साहन देणे , वन किंवा जंगलांचे संवर्धन करणे, जमिनीची धूप थांबवणे, सर्व प्रकारच्या जलस्त्रोतांचे संरक्षण करणे यासारख्या अनेक मुद्दांचा त्यात समावेश होता. परंतु अजूनही जगातल्या विकसित देशांकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळालेला नाही. भारतासारख्या देशाने विकसित देशांपेक्षाही अधिक वेगाने काही उपाययोजना सुरू केल्या आहेत. परंतु या सगळ्या तापमानाला, पर्यावरणालाही संतुलित ठेवणाऱ्या जंगलांचे संवर्धनदेखील तितकेच महत्त्वाचे ठरते. आजच्या जागतिक वनदिनाच्यानिमित्ताने भारतातील वने किंवा जंगले वेगाने नष्ट होत असल्याच्या प्रकाराकडे दुर्लक्ष करता येणार नाही. दोन वर्षापूर्वीच्या एका अहवालाप्रमाणे रोज देशातील पस्तीस हेक्टर जंगल नाहीसे होत असल्याचे सांगितले गेले होते. म्हणजे वर्षाकाठी काही हजार हेक्टर जंगल नाहीसे होत असल्याचे म्हणावे लागते. म्हणजे एकीकडे अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांना प्रोत्साहन दिले जात असताना किंवा तापमान वाढीच्या विरोधात काही प्रयत्न केले जात असताना दुसरीकडे मात्र जंगलांची होणारी ही बेसुमार हानी तितकीच धोकादायक ठरते. जागतिक स्तरावरसुद्धा जंगले नष्ट होण्याचा वेग प्रचंड आहे.

**वेगाने नाहीशी होणारी जंगले**

भारतासारख्या विविधतापूर्ण भौगोलिक परिस्थिती असलेल्या देशात वने किंवा जंगलांची एक आगळीवेगळी निसर्गसंपदा लाभली आहे. हिमालयांच्या पर्वतराजी , विंध्य, सह्याद्री, सातपुडा, मलयगिरी, अशा कितीतरी भव्य पर्वतरांगांमुळे जंगलांचे वैविध्य भारताला लाभले आहे. परंतु विकासाचे अनेक नवीन प्रकल्प औद्योगिकरण आणि वेगाने होत असलेले शहरीकरण जंगलांची नासधूस करताना दिसून येतात. याचा अर्थ काळाबरोबर आवश्यक असलेला विकास करायचा की नाही असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. परंतु पर्यावरणाचा ऱ्हास करून केला जाणारा विकास हा फार काही नियोजनबद्ध विकास म्हणता येणार नाही. अधिकाधिक प्रमाणात जंगले किंवा वने टिकली पाहिजेत. एवढेच नव्हे तर नवी जंगलं निर्माण करण्याचाही उद्देश ठेवला गेला पाहिजे. म्हणजे रोज जर पस्तीस हेक्टर जंगल नाहीसे होत असेल तर रोज पस्तीस हेक्टर क्षेत्रात तितकीच वृक्षलागवड तरी होते का याचाही विचार झाला पाहिजे त्याप्रमाणात वृक्षलागवड होत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आहे ती जंगले किंवा वनसंपदा टिकवण्याला प्राधान्य दिले गेले पाहिजे. आज पायाभूत सुविधांच्या नावाखाली जर जंगलांचे घास गिळले जात असतील तर पर्यावरणाचा विनाश तर अटळ आहेच. परंतु केला जाणारा विकास हा शाश्वत स्वरूपाचा नाही. हेसुद्धा लक्षात घ्यावे लागेल. भविष्यकाळातील सतत वाढणारे तापमान काही प्रमाणात का होईना नियंत्रणात आणायचे असेल तर जंगलांचे संवर्धन अत्यंत महत्त्वाचे ठरते. यासाठी अतिशय काटेकोर नियोजनाची आणि विकासविषयक सार्वकालिक दृष्टीकोनाची आवश्यकता आहे. केवळ विकसित देशांची बरोबरी करायची आहे म्हणून मोठमोठ्या प्रकल्पांना जंगलांच्या जमिनी आंदण द्यायच्या आणि आपल्याच पायावर धोंडा पाडून घ्यायचा हा प्रकार टाळला पाहिजे. अपवादात्मक किंवा अत्यावश्यक परिस्थितीतच विकासकामांसाठी जंगलतोड होऊ शकते. किंबहुना ती करीत असताना तेवढ्याच क्षेत्राचे नव्याने जंगल निर्माण करणे किंवा दुप्पट प्रमाणात वृक्षलागवड केली जाणे हा त्यावरचा उपायही ठरू शकतो. आज भारताचे ज्या वेगाने शहरीकरण होत आहे. , टोलेजंग इमारती उभ्या राहात आहेत. सुपिक जमिनी वापरून जंगलांच्या जीवितालाच नख लावले जाते आहे.

**जल, जंगल, जमीन, पुढे काय**

केंद्र सरकारने जल, जमीन, जंगल या नावाची घोषणा करून या तीनही निसर्गसंपदांना जपण्याची भूमिका घेतली त्यासंदर्भात थोडेफार प्रयत्न केले जात आहेत. परंतु वेगाने घटत जाणारे जंगल क्षेत्र सोयिस्करपणे दुर्लक्षित केले जाते आहे. अगदी आपल्या महाराष्ट्राचे जरी उदाहरण घेतले तरी ही बाब ठळकपणाने लक्षात येते. चंद्रपूर, ठाणे, नंदुरबार, यासारखे आदिवासीबहुल जिल्हे तिथे मोठमोठी जंगले आहेत. परंतु वेगवेगळ्या विकासयोजना आणि शहरीकरणाने ही जंगले आक्रसत चालली आहेत. अगदी मुंबईमध्येसुद्धा आर एसारखे जंगल मेट्रोसाठी काही प्रमाणात वापरले गेले. हा प्रकार देशातील सगळ्याच महानगरांबाबत झाला. दिल्ली, कोलकाता, बंगलोर, हेदेखील त्याला अपवाद राहिलेले नाहीत. माणसांच्या वस्तीने जंगलांवर केलेले हे अतिक्रमणच आहे. ताडोबा, मेळघाट, पेंच, यासारखी अभयारण्ये टिकवण्यासाठी बराच आटापिटा करावा लागतो आहे. या जंगलतोडीमुळे केवळ वृक्षांचीच नासधूस होते असे नाही तर जमिनीची धूप होते. पर्वतराजींमध्ये असलेले जलस्त्रोत नाहीसे होतात. एवढेच नव्हे तर भूगर्भातील पाण्याचा स्त्रोतही घटत जातो. त्यातूनच आज सगळीकडे पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होऊ लागली आहे. शहराशहरांमध्ये वाढलेला बिबट्यांचा वावर हादेखील जंगले नाहीशी होत असल्याचाच परिणाम ठरतो. यासाठीच अधिक व्यापक नियोजनाची आवश्यकता आहे. प्रामुख्याने जंगलांना धक्का लागणार नाही. परंतु विकासाचा हेतू साध्य होईल असा समन्वय साधणारे धोरण अनिवार्य ठरणार आहे.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**योग्यता (क्वॉलिटी) माणसाला स्थान देते.श्रद्धा माणसाला ज्ञान देते.नम्रता माणसाला मान देते आणि यासर्व गोष्टी ज्याच्याकडे असतात, जग त्यालाच सन्मान देते.**

## पंचांग

**गुरुवार २१ मार्च २०२४**
**शक १९४५ शोभननामसंवत्सर**



**फाल्गुन शुक्ल द्वादशी**
**नक्षत्र : आश्लेषा**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**

**रवी उदय- ०६-४३**
**रवी अस्त- १८-४९**

**गोविंद द्वादशी, तिथिवासर सकाळी ८.५८ पर्यंत, भारतीय सौर चैत्र शके १९४६ प्रारंभ, जागतिक वन दिन,कविता दिन, जमशेदजी नौरोज**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## पाककृती



## होममेड थंडाई



★ **साहित्य-** एक चमचा बडिशेप, पाच ते सहा बदाम, एक चमचा खरबुजाच्या बिया, तीन ते चार हिरव्या वेलच्या, एक चमचा खसखस, एक चमचा सुकवलेल्या गुलाबाच्या पाकळ्या, एक कप साखर, काळी मिरी - आठ , पाच ते सहा पिस्ता, काजू, थंड दूध, केशर, एक ग्लास पाणी

★ **कृती -** एका बाऊलमध्ये बदाम, काजू, पिस्ता, बडिशेप, गुलाबाच्या पाकळ्या, खरबुजाच्या बिया, काळी मिरी, हिरवी वेलची, खसखस एकत्रित घ्या आणि एक ग्लास पाण्यामध्ये सर्व सामग्री भिजत ठेवा. हवे असल्यास आपण यामध्ये केशर देखील मिक्स करू शकता. तीन ते चार तास सर्व सामग्री भिजत ठेवा. पातळ पेस्ट तयार करून घ्या. सर्व सामग्री व्यवस्थित भिजल्यानंतर मिक्सरच्या भांड्यामध्ये वाटा आणि पातळ पेस्ट तयार करा.कापडाच्या मदतीने पेस्ट गाळा. एका स्वच्छ व पातळ कापडाच्या मदतीने हे मिश्रण गाळून घ्यावे. साखर आणि दूध एकत्रित घ्यावे. आता दुसऱ्या भांड्यामध्ये साखर घ्या आणि त्यामध्ये दोन ग्लास थंड दूध ओतावे. यानंतर थंडाईचे मिश्रणही दुधामध्ये मिक्स करा. तयार आहे स्पेशल थंडाई साखर पूर्णपणे विरघळली जाईल, याची काळजी घ्यावी. तयार आहे टेस्टी आणि हेल्दी होममेड थंडाई



# आयपीएलचा सलामीचा सामना रंगतदार ठरणार धोनीच्या चेन्नईसमोर विराटच्या बंगळुरूचे आव्हान

■ चेन्नई



**भारतासह जगभरातील क्रिकेट चाहते ज्या स्पर्धेची वाट पाहत असतात ती इंडियन प्रीमियर लीग स्पर्धा २२ मार्चपासून सुरु होत आहे. गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यामध्ये सलामीचा सामना होणार आहे.**

चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यामध्ये आतापर्यंतच्या १६ आयपीएलमध्ये ३१ मॅच झालेल्या आहेत. या सामन्यांचे रेकॉर्ड पाहिले असता चेन्नईनं २० मॅचमध्ये विजय मिळवला आहे. तर, आरसीबीनं १० मॅचमध्ये विजय मिळवला आहे. दोन्ही टीममधील एक मॅच अनिर्णित राहिली होती. चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत ८ मॅच झालेल्या आहेत. यापैकी ७ मॅचमध्ये चेन्नईने विजय मिळवत आरसीबीला पराभूत केले आहे. आरसीबीला २००८ नंतर चेपॉकवर विजय मिळवता आलेला नाही. चेन्नईचं होम ग्राऊंड असलेल्या चेपॉकवर सीएसके आणि आरसीबी यांच्यात २०२३ च्या आयपीएलमध्ये लढत झाली होती. या लढतीत चेन्नईने ६ विकेट गमावून २२६ धावा केल्या होत्या. त्या मॅचमध्ये डिवोन कॉन्वेनं ८३, शिवम दुबेने ५२ धावा केल्या होत्या. फाफ डु प्लेसिसच्या ६२ आणि ग्लेन मॅक्सवेलच्या ७६ धावांची खेळी वाया गेली होती. चेन्नईने ती मॅच जिंकली होती.आरसीबीच्या टीमला यंदा चेपॉकवरील पराभवाची मालिका खंडीत करण्याची संधी आहे. सीएसकेने आतापर्यंत पाचवेळा आयपीएलच्या स्पर्धेचं विजेतेपद पटकावले होतं. २०१० , २०११ , २०१८ , २०21 आणि २०२३ मध्ये धोनीच्या टीमने विजय मिळवला होता. आरसीबीनं २००९ , २०११ आणि २०१६ ला अंतिम फेरीत धडक दिली होती. .दरम्यान, चेन्नई सुपर किंग्जची बॅटिंगसाठी यंदाच्या आयपीएलमध्ये महेंद्रसिंह धोनी, रवींद्र जडेजा, राचीन रविंद्र, ऋतुराज गायकवाड, डिवॉन कॉन्वे, अजिंक्य रहाणे यांच्यावर असेल. दुसरीकडे आरसीबीकडून फाफ डु प्लेसिस, रजत पाटीदार, विराट कोहली, अनुज रावत, दिनेश कार्तिक यांच्यावर फलंदाजीची जबाबदारी असेल तर ग्लेन मॅक्सवेलसारखा ऑलराऊंडर देखील त्यांच्याकडे आहे. मोहम्मद सिराज आणि आकाशदीप हे बॉलिंगची धुरा सांभाळतील.

# केएमपी कबड्डी स्पर्धेत अहमदनगरचा विजय

■ पुणे



क्रांतिज्योत महिला प्रतिष्ठान युवा कबड्डी सीरिज २०२४ मध्ये आजपासून प्रमोशन फेरीला सुरुवात झाली. 'अ' व 'ब' गटातील टॉप ४ संघ असे एकूण ८ संघ या फेरीत खेळणार आहेत. ८ ही संघ प्लेऑफसमध्ये खेळणार असून या फेरीतील क्रमवारी महत्वपूर्ण असणार आहे. आजचा पहिला सामना अहमदनगर विरुद्ध नंदुरबार यांच्यात झाला. पहिल्याच चढाईत प्रफुल झावरेची पकड करून नंदुरबार संघाने गुण मिळवला तर पुढील चढाईत जयेश महाजनने गुण मिळवत नंदुरबार संघाला दुसरा गुण मिळवून दिला. अहमदनगरच्या आशिष यादव ने २ गुण मिळवत सामना २-२ असा बरोबरीत आणला पहिल्या १० मिनिटात सामना ७-७ असा बरोबरीत होता. त्यानंतर अहमदनगरच्या चढाई पटूंनी व बचावपटूंनी गुण मिळवत मध्यांतरापुर्वी नंदुरबार संघाला ऑलआऊट करत अहमदनगर संघाने १८-९ अशी आघाडी मिळवत जोरदार पलटवार केला. सामन्याची शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना नंदुरबार संघाने अहमदनगर संघाला ऑलआऊट करत २३-३३ अशी आपली पिछाडी कमी केली. पुढील चढाईत जयेश महाजनने २ गुण मिळवत पिछाडी आणखी कमी केली.

# आयपीएलमध्ये तीन रंगांच्या जर्सीवर बंदी

■ पुणे

इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेत तीन रंगांवर बंदी घालण्यात आली आहे. बीसीसीआयने स्पर्धेत सहभागी असलेल्या दहाही फ्रेंचायसींना याबाबत सक्त ताकीद दिली आहे. त्यामुळेच काही संघांच्या जर्सीत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. आयपीएल स्पर्धेत यापूर्वी तुम्ही जर्सीवर पांढरा, ग्रे आणि चंदेरी रंग पाहिले असतील. आता हे तिन्ही रंग वापरण्यास बीसीसीआयने मज्जाव केला आहे. तसेच त्या बदल्यात दुसरा रंग वापरण्याची सूचना केली आहे.पंजाब किंग्स संघाच्या जर्सीमध्ये लाल रंगासह चंदेरी आणि राखाडी रंग होता. मात्र गेल्या दोन पर्वात पंजाब किंग्स लाल तर गुजरात टायटन्स राखाडी रंगाच्या जर्सीत होते.


# यंदाच्या आयपीएलमध्ये २ नवे नियम

■ नवी दिल्ली




आता आयपीएलमध्ये बॉलर्सना एका ओव्हरमध्ये फक्त दोन बाऊन्सर टाकण्याची मुभा असेल. तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एका ओव्हरमध्ये एकच बाऊन्सर टाकण्याचा नियम आहे. पण यावेळी आयपीएलमध्ये बदल करण्यात आले आहेत यावेळी आयपीएलमधील सर्वाधिक चर्चेत असलेला नियम स्मार्ट रिव्ह्यू सिस्टम लागू करण्यात येणार आहे. या नियमामुळे अम्पायर्सना आपला निर्णय देताना मदत मिळणार आहे. ईएसपीएन क्रिकइन्फोनुसार, आतापासून टीव्ही अम्पायर्स आणि हॉक-आय ऑपरेटर एकाच खोलीत बसतील. यामुळे टीव्ही अम्पायर्सना निर्णय देण्यात खूप मदत होईल. दरम्यान, आतापर्यंत टीव्ही अंपायर आणि हॉक-आय यांच्यामध्ये टीव्ही प्रसारण दिग्दर्शक खूप महत्त्वाचा होता. ब्रॉडकास्ट डायरेक्टर निर्णय देण्यासाठी हॉक-आयपासून टीव्ही अंपायरला सर्व फुटेज द्यायचा. पण आता टीव्ही ब्रॉडकास्ट डायरेक्टरची भूमिका संपणार आहे. आतापासून टीव्ही अम्पायर्स आणि हॉक-आय ऑपरेटर एकाच खोलीत बसतील. अशाप्रकारे, स्मार्ट रिप्ले प्रणालीअंतर्गत, टीव्ही अंम्पायर्सना आता थेट हॉक-आय ऑपरेटरकडून माहिती मिळणार आहे. अम्पायर्सना हॉक-आयच्या आठ हायस्पीड कॅमेऱ्यांमधून काढलेले फोटो मिळतील, ज्यामुळे निर्णय देणं सोपं होईल. तसेच, नवीन नियमांनुसार, टीव्ही अम्पायर्सना अधिक फुटेज पाहण्याची सुविधा असेल.

# ज्येष्ठ राष्ट्रीय कबड्डीपटू वसंत ढवण यांचे निधन



■ मुंबई

महाराष्ट्राचे ज्येष्ठ राष्ट्रीय कबड्डी खेळाडू वसंत ढवण यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी सावित्रीबाई, तीन मुलगे, मुलगी, सूना व नातवंडे असा परिवार आहे. तीन दिवसांपूर्वी त्यांना अचानक अस्वस्थ वाटल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.अखेर मंगळवारी दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. ढवण हे मूळचे कणकवलीचे. लोअर परेल येथील श्रीराम कबड्डी संघाकडून त्यांनी कबड्डी खेळाला सुरुवात केली. फिनिक्स मिलकडून १०वर्षे ते कबड्डी खेळले. त्यानंतर काही काळ लक्ष्मीरतन या संघाकडून व त्यानंतर त्यांना महिंद्र संघाकडून खेळाडू म्हणून नोकरी देण्यात आली. अमृतसर येथे १९६१साली झालेल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत ते प्रथम महाराष्ट्राकडून खेळले. त्यानंतर जबलपूर, अलाहाबाद, कोल्हापूर - महाराष्ट्र(१९६४), हैदराबाद, बडोदे आदी स्पर्धांमधून खेळले. त्यांना कबड्डी योद्धा हा पुरस्कार शरदचंद्र पवार यांच्या हस्ते देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला होता.

**जाहीर सूचना**

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, प्लॉट क्र. १५/२, स. क्र. ४१(भा), लोखंडवाला संकूल, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३ येथे स्थित नोंद. क्र. बीओएम/एचएसजी/केडब्ल्यू/७२६८/१९८२ असलेल्या इमारत "वर्सोवा प्लेझन्ट पार्क" को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. ("सदर संस्था") मधील १ ल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०२ ("सदर सदनिका") च्या संदर्भात मालकी हक्क, शीर्षक, हिस्सा आणि हितसंबंध असणाऱ्या मालक आणि बोनाफाईड सदस्या आणि दुय्यम भाग प्रमाणपत्र क्र. ३० दिनांक ९ एप्रिल, २००९ ("सदर दुय्यम भाग प्रमाणपत्र") अन्वये क्रमांक ६ ते १० धारण केलेल्या रु. ५०/- प्रत्येकी चे पाच पूर्णतः भरणा केलेले समभागांच्या धारणकर्त्या सौ. व्हायोलेट ए. प्रेम यांच्या शीर्षक आणि मालकीहक्काची तपासणी करायची आहे.

जाअर्थी सौ. चारुशीला पॅट्रिक यांनी सदर सदनिका क्र. १०२ श्री. अशोक जी बथिजा आणि सौ. विद्या जी. बथिजा आणि मे. लोखंडवाला डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन विकासक म्हणून, यांच्याकडून त्यांच्या दिनांक १६ जून, १९८२ रोजीच्या त्रिपक्षीय करारपत्रानुसार खरेदी केली होती. सौ. चारुशीला पॅट्रिक यांच्या मृत्युनंतर, सदर सदनिका आणि समभाग उत्तराधिकार कायद्यानुसार त्यांची केवळ मुलगी, सौ. व्हायोलेट ए. प्रेम यांना हस्तांतरित झाले. सौ. व्हायोलेट ए. प्रेम यांनी काही मूळ दस्तऐवजांचा योग्यरित्या शोध घेतला आणि ते सापडत नसल्याचे आढळून आले आहे, ज्याकरिता त्यांनी संबंधित ओशिवरा पोलीस स्थानक येथे गहाळ अहवाल दाखल केला आहे:-

हरवलेल्या/गहाळ कागदपत्रांची अनुसूची:-

१. मे. लोखंडवाला डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन (त्यामधील बिल्डर) आणि श्री. अशोक जी बथिजा आणि सौ. विद्या जी बथिजा (त्यामधील सदनिका धारक) यांच्या दरम्यानचे दिनांक ०५.०३.१९८१ रोजीचे मूळ बिल्डरचे पहिले करारपत्र. गहाळ अहवाल क्र. ४००६/२००८ दिनांक ०९.०९.२००८.

२. श्री. अशोक जी बथिजा आणि सौ. विद्या जी. बथिजा (त्यामधील पहिला भाग), सौ. चारुशीला पॅट्रिक (त्यामधील दुसरा भाग) आणि मे. लोखंडवाला डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन (त्यामधील विकासकाचा तिसरा भाग) यांच्या दरम्यानचे दिनांक १६.०६.१९८२ रोजीचे मूळ त्रिपक्षीय करारपत्र आणि गहाळ अहवाल क्र. ३५९६५/२०२४ दिनांक २०.०३.२०२४.

कोणी व्यक्ती/पक्षकार, न्यायिक, अर्ध-न्यायिक प्राधिकरण, वित्तीय संस्था, बँक यांचा **वरील उल्लेखित सदर सदनिका, समभाग, मालकी हक्क किंवा वर उल्लेखिलेल्या गहाळ शीर्षक करारनाम्यांच्या संदर्भात कोणत्याही स्वरुपाचा कोणताही आक्षेप असल्यास किंवा सदर मालमत्तेच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार किंवा अन्य कशाही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा इतर कोणत्याही प्रकारचे दावे** असल्यास त्याबाबत निम्नस्वाक्षरीकारांना लेखी स्वरुपात खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह, सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून **दहा दिवसांच्या** आत सूचित करावे, असे न केल्यास असा कोणताही दावा सोडून दिला आणि/किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल आणि त्यानंतर कोणत्याही तक्रार/आक्षेपाची दखल घेतली जाणार नाही आणि ती रद्दबातल असेल.

**दिनांक २१ मार्च, २०२४**

सही/-
**श्री. सुरेश आर. सावंत**
**ॲडव्होकेट, उच्च न्यायालय, मुंबई**
दुकान क्र. ९, निशांत सोसायटी, अविनाश टॉवर समोर, सात बंगलोज, अंधेरी (पश्चिम), मुंबई-५३. **कार्यालय: ८०९७००२८९०. मोबा.- ९८२१५२०७१२.**
ईमेल: adv.sureshsawant@gmail.com

**ननाई डेअरी प्रायव्हेट लिमिटेड - परिसमापनामध्ये**
एलएलपीआयएन: U15209MH2009PTC189530
नोंद. पत्ता: जी-१, अविष्कार एम्प्रेस, के. डब्ल्यू. चितळे पथ, पोर्तुगिज चर्चच्या मागे, दादर (प), मुंबई - ४०००२८, महाराष्ट्र, भारत

**ई-लिलाव सूचना**

आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ सह वाचावयाच्या नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये ननाई डेअरी प्रायव्हेट लिमिटेड ('कॉर्पोरेट ऋणको')च्या मालमत्तेची विक्री
**ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ: १८ एप्रिल २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ०२.००**
**(प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)**

माननीय राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे **सी.पी.(आयबी) क्र. ४४५५/२०१९ मधील आय.ए. ३३१०/२०२३** मध्ये दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकाद्वारे कॉर्पोरेट ऋणकोच्या मालमत्तेची विक्री. विक्री निम्नस्वाक्षरीकाराद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म **https://eauctions.co.in (लिंकस्टार इन्फोसिस प्रायव्हेट लिमिटेड)** मार्फत करण्यात येईल.

| संपत्तीचा तपशील: | ब्लॉक | राखीव किंमत | इसारा रक्कम अनामत | विस्तारयोग्य मूल्य |
|---|---|---|---|---|
| सध्या पाली बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र - ४१० २०६ येथे असलेले दूध प्रक्रिया संयंत्र, व्हॅक्यूम मिल्किंग संयंत्र व सहाय्यक उपकरणे, एस. एस. स्वयंचलित व्हॉल्यूमेट्रिक फिलिंग मशीन, क्रीम सेपरेटर टॅंक्स इ. एकत्रितरित्या समाविष्ट असलेली प्लान्ट आणि मशिनरी. (तपशीलवार लिलाव प्रक्रिया दस्तऐवजामध्ये उल्लेखित परिसमापकाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण यादी) | I | ₹ २८,००,०००/- | ₹ २,८०,०००/- | ₹ १,००,०००/- |

| | |
|---|---|
| पात्रता प्रपत्रे सादरीकरणाचा अंतिम दिनांक | दि. ४ एप्रिल, २०२४ रोजी तपशीलवार ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजामध्ये उल्लेखिलेल्या पद्धतीने |
| पात्रता बोलीदाराची उद्घोषणा | दि. ६ एप्रिल, २०२४ |
| कॉर्पोरेट ऋणकोच्या संपत्तीची पाहणी | दि. ७ एप्रिल, पासून दि. १३ एप्रिल, २०२४ पर्यंत |
| इसारा रक्कम अनामत सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक | दि. १६ एप्रिल, २०२४ |
| पात्र बोलीदारांकरिता ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | दि. १८ एप्रिल, रोजी स. ११.०० ते दु. ०२.०० |

**विक्रीच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे:**
१. ई-लिलाव "जसे आहे जेथे आहे" "जसे आहे जे आहे" तत्त्वावर घेण्यात येईल. कारण ही विक्री ई-लिलाव एजन्सी (लिंकस्टार)च्या वतीने मान्यताप्राप्त सेवा प्रदाता लिंकस्टार इन्फोसिस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मार्फत कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसानभरपाईशिवाय असेल. **संपर्क व्यक्ती: श्री. दीक्षित प्रजापती, ईमेल - id-admin@eauctions.co.in, मोबाईल क्र.: +९१ ९८७००९९७१३. २.** पात्रता दस्तऐवज परिसमापकास ईमेलद्वारे आणि हार्ड कॉपी तपशीलवार ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजामध्ये विहीत नमुन्यामध्ये दि. ४ एप्रिल, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ०५.०० च्या आधी सादर करावे. संपूर्ण ई-लिलाव प्रक्रियेच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसह बोली अर्ज वेबसाईट **https://eauctions.co.in** येथून डाऊनलोड करता येईल. **३.** असे स्पष्ट करण्यात येते की, सदर आमंत्रणाचा हेतू संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करणे आहे आणि याद्वारे परिसमापक किंवा कंपनीवर विक्री प्रभावी करण्याच्या दायित्वाचे बंधन नाही. परिसमापक कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय प्रक्रिया रद्द करण्याचे किंवा बदलण्याचे आणि/किंवा कोणत्याही इच्छुक पक्षकारास/संभाव्य गुंतवणुकदार/बोलीदारास न स्वीकारण्याचे आणि/किंवा अपात्र करण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत. **४.** ईएमडी सादर करण्यापूर्वी आणि प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यापूर्वी सर्व अटी आणि शर्ती अनिवार्यपणे तपशीलवारपणे ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजामधून पहाव्या. परिसमापकास **liqnanai@gmail.com** येथे संपर्क साधता येईल.

**सीए प्रशांत जैन**
**दिनांक: २१.०३.२०२४**
**ठिकाण: नवी मुंबई**
**परिसमापक - ननाई डेअरी प्रायव्हेट लिमिटेड**
**आयबीबीआय नोंद क्र.: IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131**
**ईमेल आयडी: ipprashantjain@gmail.com; liqnanai@gmail.com**
**पत्रव्यवहाराचा पत्ता: स्सार्वी रिझॉल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी, बी-६१०, बीएसईएल टेकपार्क, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई - ४००७०५.**
**संपर्क क्र. +९१ ९०८२६०७७०३ (व्हॉट्सॲपवर संपर्क करावा)**